# मिरा भाईंदर महानगरपालिका

जा.क्र.माअधि/अपिल/ ०९ /२०१९-२०
प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य लेखापरीक्षक
मिरा भाईंदर महानगरपालिका
स्व.इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती
शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प)
ता.जि.ठाणे-४०१ १०१, दुरध्वनी क्र : २८१९२८२८
Email.Id:- mbmcaudit@gmail.com
मुख्य लेखापरीक्षक यांचे कार्यालय
जा.क्र.मनपा/मुलेप/ ९८ /2019-20
दि. ११/६ /2019

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्यलेखापरीक्षक मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेसमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

**श्री.चंदन ठाकुर**
**ए विंग फ़्लॅट नं-१०८, बिल्डींग नं-०१,सिध्दिविनायक बिल्डिंग,**
**MBMC प्रभाग जवळ, तलाव रोड, भाईंदर (पु)-४०११०५** ..... **अपिलार्थी**

**विरुध्द**

**जनमाहिती अधिकारी तथा**
**सहा.लेखापरीक्षक, लेखापरीक्षण विभाग** ......**प्रतिवादी**

## :- विवेचन :-

अपिलार्थी श्री.चंदन ठाकुर पत्ता ए विंग फ़्लॅट नं-108, बिल्डींग नं-01,सिध्दिविनायक बिल्डिंग, MBMC प्रभाग जवळ, तलाव रोड, भाईंदर (पु) यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती अधिकाराखालील अर्ज सामान्य प्रशासन विभागाने लेखा विभागास दिलेला आहे. तथापि श्री.चंदन ठाकुर यांचे दि.10/05/2019 रोजीचे प्रथम अपिल दि.27/05/2019 रोजी प्राप्त झाले आहे. सदर अपिल मुख्य लेखापरीक्षक यांच्या कार्यालयात दाखल केले असुन अपिलाची सुनावणी दि.11/06/2019 रोजी दुपारी 12.30 वाजता ठेवण्यात आली होती.

**अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचा तपशिल:-**

अपिलाच्या अनुषंगाने मुळ माहिती अधिकारांतर्गत अर्जदाराने सादर केलेल्या अर्जाची छायाप्रत सामान्य प्रशासन विभागाकडुन हाती मागविण्यात आली. सदर अर्जात नमुद

केल्यानुसार गृहनिर्माण संस्थांना सुक्या व ओल्या कच-याचे डब्बे खरेदी करुन वाटप करणे कामाच्या देयक प्रमाणकांच्या छायाप्रती, लेखापरीक्षण ज्ञापन व आक्षेप इत्यादी माहिती अपेक्षिलेली आहे.

**अपिल दाखल करण्याचे कारण:-**

माहिती अधिकारात मागितलेली माहिती प्राप्त न झाल्याने अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा सहा. लेखापरीक्षक यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.11/06/2019 रोजी दुपारी 12.30 वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र/मनपा/मुलेप/11/2019-20 दि.28/05/2019 रोजी पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यानुसार सदर सुनावणीस खालीलप्रमाणे अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

१) श्री.चंदन ठाकुर (अपिलार्थी)
२) सहा. लेखापरीक्षक तथा जनमाहिती अधिकारी, लेखापरीक्षण विभाग

**जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तीवाद:-**

जनमाहिती अधिकारी (लेखापरीक्षण विभाग) यांनी सदर माहिती अधिकारातील अर्ज सामान्य प्रशासन विभागाने लेखा विभागाकडे वर्ग केलेला आहे असे नमुद केले. दरम्यान अपिलार्थी यांनी सदरचे अपिल लेखा व लेखा परीक्षण या दोन्ही विभागास दि.27/05/2019 रोजी दिलेले आहे. त्यानुसार सदर अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाची पडताळणी केली असता त्यांना गृहनिर्माण संस्थांना सुक्या व ओल्या कच-याचे डब्बे खरेदी करुन वाटप करणे कामाच्या देयक प्रमाणकांच्या छायाप्रती, लेखापरीक्षण ज्ञापन व आक्षेप इत्यादी माहिती अपेक्षित आहे. त्यानुसार जा.क्र.मुलेप/16 व 17 /2019-20 दि.03/06/2019 अन्वये लेखा व सार्व. आरोग्य विभागास अर्जदारास अपेक्षित असलेली माहिती देणेबाबत कळविण्यात आलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागाकडुन प्रस्ताव/देयके लेखापरीक्षण विभागामध्ये प्राप्त होतात. सदर प्रस्ताव व देयकांची तपासणी केली असता त्यामध्ये उणिवा/त्रुटीची पुर्तता त्याचवेळी विभागाकडुन करुन घेतली जाते. काही अभिप्राय/आक्षेप असल्यास सबंधित प्रस्तावावरच देण्यात येतात. त्यामुळे स्वतंत्र असे ज्ञापन पुर्व लेखापरीक्षणात दिले जात नाही.

**अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तीवाद :-**

अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान आपल्या युक्तीवादामध्ये गृहनिर्माण संस्थांना सुक्या व ओल्या कच-याचे डब्बे खरेदी करुन वाटप करणे कामाच्या देयक प्रमाणकांच्या छायाप्रती, लेखापरीक्षण ज्ञापन व आक्षेप याबाबतची माहिती प्राप्त झालेली नाही.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

-:निर्णय:-

अ) गृहनिर्माण संस्थांना सुक्या व ओल्या कच-याचे डब्बे खरेदी करुन वाटप करणे कामाचे प्रमाणक व देयक यांच्या छायाप्रती जनमाहिती अधिकारी लेखा विभाग यांनी अपिलार्थी यांना उपलब्ध करुन द्याव्यात.

ब) जनमाहिती अधिकारी लेखापरीक्षण विभाग यांनी लेखापरीक्षण ज्ञापन व आक्षेप याबाबतची माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन द्यावी.

क) जनमाहिती अधिकारी आरोग्य विभाग यांनी सुक्या व ओल्या कच-याचे डब्बे गृहनिर्माण संस्थांना वाटप केल्याबाबतच्या माहितीचे स्पष्टीकरण अपिलार्थी यांना उपलब्ध करुन द्यावे.

वरील माहिती अपिलार्थी यांना जनमाहिती अधिकारी यांनी 7 दिवसात उपलब्ध करुन द्यावी.

उपरोक्त निर्णयाप्रमाणे सदर अपिल अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

सदर आदेशाविरुध्द अपिल करावयाचे असल्यास मा. राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, 5 वा मजला, दालन क्र.528, कोकण भवन, सी. बी.डी. बेलापुर, नवी मुंबई - 400614 यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासुन 90 दिवसांच्या आत अपिल दाखल करता येईल.

११.०६.१९
११.०६.२०१९

(दिग्विजय चव्हाण)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
मुख्य लेखापरीक्षक
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति
1) श्री.चंदन ठाकुर
ए विंग फ़्लॅट नं-१०८, बिल्डींग नं-०१,सिध्दिविनायक बिल्डिंग,
MBMC प्रभाग जवळ, तलाव रोड भाईंदर (पु)-४०११०५
2) जनमाहिती अधिकारी, लेखा विभाग
3) जनमाहिती अधिकारी, लेखा परीक्षण विभाग
4) जनमाहिती अधिकारी, सार्व.आरोग्य विभाग